अपील अधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
शिवाजीनगर पुणे ४११००५
दूरध्वनी क्र. ०२०-२५५०११२३
ई मेल **aadmcgeneral@punecorporation.org**
अपिल क्र. ३६/२०१८
जा.क्र उआ (सा.प्र.)/७६६ दि. ०२/११/२०१८

## अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन) पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय

अपील क्रमांक : पुणे मनपा/अ.प्रा.उआ(सा.प्र.)/अपिल/३६/२०१८

**श्री रमेश विष्णू खामकर**
२६४, नारायण पेठ,
पुणे ४११०३०

------------------ अपिलार्थी

विरुद्ध

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी,**
मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) कार्यालय, पुणे महानगरपालिका

### माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये अपिल

**श्री रमेश विष्णू खामकर** रा. २६४, नारायण पेठ, पुणे ४११०३० (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) यांनी जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) कार्यालय, पुणे महानगरपालिका यांचेकडे दि. १४.०९.२०१८ रोजी अर्ज करून "कनिष्ठ अभियंता पदाच्या आज्ञापत्राच्या अंमलबजावणीची माहिती १) दि. २१.०७.२०१८ व दि. ०२.०८.२०१८ या (दोन आज्ञापत्र) या दिवशी काढण्यात आलेल्या कनिष्ठ अभियंता व शाखा अभियंता या पदावरील अधिका-यांचे बदल्याच्या आज्ञापत्रानुसार अंमलबजावणी झाल्याचा वस्तुस्थितीदर्शक खातेप्रमुख यांनी सादर केलेली अहवालाची सत्यप्रत. २) अंमलबजावणी अहवाल बंधनकारक असतानाही सादर न केलेल्या खातेप्रमुखावर' केलेल्या कारवाईची सत्यप्रत. ३) हे बदली आदेश पायदळी तुडवून अद्यापही बदली पूर्व खात्यात कार्यरत असणा-या संबंधित अधिकाऱ्यांवर खातेप्रमुखांनी केलेल्या कारवाईची सत्यप्रत ४) असे अधिकारी बदली पूर्वक खात्यात कार्यरत असूनही खातेप्रमुखांनी त्याकडे दुर्लक्ष करून न केलेल्या कारवाई बाबत खातेप्रमुखांवर करण्यात आलेल्या कारवाईची सत्यप्रत" या मुद्द्याबाबत माहिती मागितली होती.

अपिलार्थी यांचे मुळ अर्जातील माहिती बाबत जन माहिती अधिकारी, अति. महापालिका आयुक्त (ज) कार्यालय, पुणे महानगरपालिका यांनी जा. क्र. अतिमआ/(ज)/८४४२ दि. ०८.१०.२०१८ अन्वये अर्जास उत्तर दिलेले आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्जावरील दिनांक | अर्ज प्रत्यक्ष प्राप्त झाल्याचा दि. | माहिती द्यावयाचा अंतिम दि. | अपिलार्थीस उत्तर/माहिती पाठविल्याचा दि. | विलंब दिवस |
| १४.०९.२०१८ | १४.०९.२०१८ | १३.१०.२०१८ | ०८.१०.२०१८ | - |

अपिलार्थी यांनी "माहिती न दिल्याने मी हे अपील दाखल करीत आहे. "असे नमूद करून अपील क्र. ३६/२०१८ चा अपील अर्ज दि. १७.१०.२०१८ रोजी दाखल केलेला आहे.

| अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अपील अर्जाचा दिनांक | अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दि. | अपील दाखल करावयाचा अंतिम दि. | अपील अर्ज मुदतीत दाखल केला आहे का? | अपील अर्जाच्या विलंब बाबत निवेदन दिले आहे का? |
| १७.१०.२०१८ | १७.१०.२०१८ | ०६.११.२०१८ | होय. | - |

सदर प्रकरणी दि. ०१.११.२०१८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आलेली होती. सदर सुनावणीस अपिलार्थी **श्री रमेश विष्णू खामकर** रा. २१४, नारायण पेठ, पुणे ४११०३० उपस्थित होते व **श्री मिलिंद सबनीस, जन माहिती अधिकारी अति. महापालिका आयुक्त (ज) कार्यालय, पुणे मनपा** हे उपस्थित होते.

## विवेचन

**अपिलार्थी श्री रमेश विष्णू खामकर** यांनी माहिती मिळाली नाही असे प्रतिपादन केले. तर **श्री मिलिंद सबनीस, जन माहिती अधिकारी अति. महापालिका आयुक्त (ज) कार्यालय, पुणे मनपा** यांनी अपिलार्थी यांना जा. क्र. अतिमआ/(ज)/८४४२ दि. ०८.१०.२०१८ अन्वये उत्तर दिलेले आहे असे नमूद केले.

## आदेश

अपिलार्थी यांची विनंती मान्य करण्यात येत आहे. **जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे मनपा** यांनी कार्यालयीन कामकाजाचे १५ दिवसात अपिलार्थी यांना त्यांचे मूळ माहिती अर्जाचे अनुषगाने माहिती विनामुल्य उपलब्ध करून द्यावी. अपिल क्र. ३६/२०१८ निकाली काढण्यात येत आहे.

(अनिल मुळे)
अपिलीय प्राधिकारी
उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका